आपलं कोल्हापूर
पुढारी
ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग,
…, गोवा येथून एकाचवेळी प्रसिद्ध
३ पुढारी
सोमवार, दि. १५ मार्च २०१०




# योग्य मार्गदर्शन मिळाल्यास उच्च शिक्षणात महिलांना संधी

## डॉ. विद्या साळोखे

प्रतिनिधी

कोल्हापूर : योग्य मार्गदर्शन मिळाल्यास महिलांना उच्चशिक्षणात संधी आहेत, असे प्रतिपादन अशोकराव माने ग्रुफ ऑफ इन्स्टिट्युटच्या एम. बी. ए. विभागाच्या डीन प्रा. डॉ. सौ. विद्या साळोखे यांनी केले.

कमला महाविद्यालयाच्या कॉमसर फोरममार्फत विद्यार्थिनीसाठी 'उच्च शिक्षणात महिलांसाठी सुवर्ण संधी' या विषयावर व्याख्यानात त्या बोलत होत्या.

डॉ. साळोखे म्हणाल्या, मुलींसाठी एम. बी. ए. हे उत्तम करिअर आहे. मुलींकडे उपजतच व्यवस्थापकीय क्षमता असतात. या क्षेत्रामध्ये फायनान्स ह्युमन रिसोर्स, मार्केटींग, कॉम्प्युटर, सिस्टीम मॅनेजमेंट ॲग्रीकल्चर ॲण्ड को. ऑपरेटिव्ह असे विशेषीकरण झाले असून त्यातून योग्य पर्याय निवडून, योग्य मार्गदर्शन घेऊन या संधी विद्यार्थिनींनी प्राप्त करून करिअर घडवावे. स्पर्धात्मक परीक्षेतून आर्मी, नेव्ही, वैमानिक, क्लास-वन ऑफिसर, आयटडी क्षेत्र, व्यवस्थापकीय क्षेत्र, बँकींग, एल.आय.सी. ऑफिसर, वकील, प्राध्यापक, प्रशासन इत्यादी क्षेत्रात अनेक संधी आहेत. याचा पुरेपूर लाभ विद्यार्थ्यांनी मिळवावा. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी कमला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे मार्गदर्शन घेण्यात आले.